# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवासी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. महाराष्ट्र राज्य /मुंबई/१९६६/२०१२ जी बी बी एस डी


१३/०२/२०१३

प्रती,

मा. श्री. शैलेशजी फणसे,

शिवसेना नगरसेवक,

सभागृह नेते, बृहन्मुंबई महानगरपालिका,

**विषय : वसाहतीमध्ये संस्थांना प्राप्त झालेल्या भांडवली मुल्यांवर आधारित मालमत्ता देयकां संदर्भात करनिर्धारक व संकलन विभागाच्या अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन करण्याबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन सदरहू निवेदन आपल्या दप्तरी दाखल करीत आहोत. भांडवलीमुल्यांवर आधारित सुधारित मालमत्ता देयके वसाहतीमधील संस्थांना प्राप्त होत आहे. संबंधीत देयकाच्या स्वरुपावरुन व माहितीवरुन संस्थांच्या पदाधिकरी व सभासदांमध्ये संभ्रम निर्माण झाले आहेत.

सदरहू विषयावर मार्गदर्शन करण्याकरिता आपल्या पुढाकाराने महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत "मार्गदर्शन सभा" विभागात आयोजित करण्याचा असोसिएशनचा मनोदय आहे.

तरी आपण सहकार्य करावे ही विनंती

कळावे,

आपले विश्वासू

सरदार वल्लभभाई पटेल नगर रहिवासी वेल्फेअर असोसिएशन

| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |
|---|---|---|
| आनंद प्र. जाधव | सुर्यकांत कृ. ननावरे | अनिल ग. परदेशी |


प्लॉट नं.७८/बी-१४, व.अं.साथी.स.गृ.सं.म. सरदार पटेल नगर (म्हाडा), वर्सोवा, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३.



Scanned with CamScanner

सरदार वल्लभभाई पटेल नगर
रहिवासी वेल्फेअर असोसिएशन
नोंदणी क्र. महाराष्ट्र राज्य / मुंबई १९६६/२०१२ जी.बी.बी.एस.डी.

सहाय्यक आयुक्त
के/पश्चिम विभाग
दि. -4 MAR 2013
वेळ: ११,१२,१३,१४,१५,१६,१७
के/प

म. सहाय्यक
कर निर्धारक व संकलक विभाग
के- पश्चिम प्रभाग, अंधेरी (प),
मुंबई- ४०००५८

दिनांक ०२/०३/२०१३

विषय : भांडवली मुल्यावर आधारित नविन कर प्रणाली अंतर्गत वितरीत करण्यात आलेल्या नवीन मालमत्ता कर देयकातील त्रूटीं बाबत.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपल्या प्रभागातील सरदार वल्लभभाई पटेल नगर वसाहती मधील सर्व सदणीका धाराकांच्या वतीने हे निवेदन आपल्या दफ्तरी आम्ही दाखल करीत आहोत.

आपण वसाहतीमधील ९८ सहकारी गृहनिर्माण संस्थांना वितरित केलेल्या मालमत्ता कर देयकांमध्ये बहूतांश संस्थान मधील सदनिकांच्या मुळ आकारमानांच्या व्यतिरिक्त पोटमाळे मोजून अतिरिक्त कर संबधीत सदनिका धारकांवर लादण्यात आला आहे. वास्तविकता अशी आहे की "दिशा विरूध्द महानगरपालिका जनहित याचिका क्र १५८ / २००६'' खटल्यात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने महानगरपालिका अधिनियम कलम ४८८ अंतर्गत नोटीस बजावून, कलम ३५८ अंतर्गत तोडक कारवाई मे. २०११ ते जून २०११ मध्ये संपूर्ण वसाहतीमध्ये घेऊन महानगरपालिकेने सर्व पोटमाळे पाडले आहेत. परिणामी आपल्या देयकांमधील "पोटमाळे व त्यावरील कर'' आपण त्वरीत रद्द करून सुधारित देयके वसाहतीमध्ये वितरीत करावीत अशी आम्हीं मागणी करीत आहोत.

तसेच आपण कर आकारणी करत असताना सदनिका धारकांच्या आर्थिक स्तर, बांधकामांचे स्वरूप लक्षात घेऊन मुळ करात ०.५ इतकी सुट दिली आहे त्याबद्दल आपले आभार ! परंतु सन् १९९३ पासून आम्हांस मुळ मालमत्ता करामध्ये ६५ टक्के इतकी सुट मिळत होती ती आपण नवीन कर प्रणाली मध्ये तशीच अंतर्भूत करावीत अशी मागणी आम्हीं करत आहोत.

उपरोक्त दोन्हीं मागण्यांचा आपण गांभीर्याने विचार करून संबधितांस योग्य ते निर्देश द्यावेत हि विनंती.

कळावे
आपले विश्वासू,
सरदार वल्लभभाई पटेल नगर रहिवासी वेल्फेअर असोसीएशन

अध्यक्ष सचिव खजिनदार

प्लॉट नं.७८/बी-१४, व.अं.साथी.म.गृ.सं.म. सरदार पटेल नगर (म्हाडा), वर्सोवा, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३.

Scanned with CamScanner

बृहन्मुंबई महानगरपालिका

BRIHANMUMBAI MAHANAGARPALIKA

No. KW/AA&C/Compl./ 7404/2012-13

10 JUN 2013

Annexure – A

To,

M/s Sardar Vallabhbhai Patel Nagar Residens Wail-fair Association, Plot No 78/B-14 V. A. Sathi CHS Ltd. Sardar Patel Nagar, MHADA Versova, Andheri (W) Mbai-400053

Asstt. Assessor & Collector K / W Ward
Municipal Corporation of Greater Mumbai
3rd Floor, Opp. Andheri BEST Bus Depot,
S. V. Road, Andheri (West),
Mumbai - 400 058.

Sub: Complaint Against C.V. lodged by you on 4-3-2013

under No. KW/AA-SC/ 7404/12-13

Ref: Property A/c No. 1 —

Sir,

This is to inform you that while scrutinizing your above referred complaint it is observed that you have not mentioned all the details of disagreement with the data used for fixing C.V. However you have not mentioned A/c No & ward Nos of properties under reference.

You are hereby requested to submit the details of any such disagreement with the data along with documentary evidence if any within 7 days from the receipt of this letter, failing which it will be presumed that you have no complaint against the data used for fixing Capital Value and the above referred complaint will be closed, which may please be noted.

Therefore, you are requested to make the payment of bills which have already served to you. If already payment is made this may please be ignored.

Yours faithfully,

Asstt. Assessor & Collector
K-West Ward

Scanned with CamScanner

O/C

# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवाशी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. : महाराष्ट्र राज्य/मुंबई/१९६६/२०१२/जी.बी.बी.एस.डी.

दिनांक २६ डिसेंबर २०१९

सहायक आयुक्त
के/पश्चिम विभाग
30 DEC 2019
वेळ-११,१२,१३,१४,१५,१६,१७
के/प.

प्रति

**बृहन्मुंबई महानगर पालिका,**
**सहाय्यक मूल्यांकनकर्ता आणि जिल्हाधिकारी के / पश्चिम,**
नगरपालिका प्रभाग कार्यालय, तिसरा मजला,
अंधेरी (डब्ल्यू), मुंबई ४०० ०५३

**विषय: करसंकलन विभागाकडून नव्याने पाठवण्यात येत असलेल्या नवीन मालमत्ता कर देयका संदर्भात पुनश्च विचार करण्याकरिता निवेदन**

महोदय,

आम्ही सरदार वल्लभभाई पटेल नगर रहिवासी वेल्फेअर असोसिएशन मार्फत अशी नम्र विनंती करू इच्छितो कि, आपण सरदार वल्लभभाई पटेल नगरातील बैठ्या सहकारी संस्थांना नव्याने अंमलात येणाऱ्या धोरणानुसार बदल करून मालमत्ता कारासंबंधित पत्रव्यवहार सुरु केला आहे. आपण किंवा नगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्याने संस्थांना आणि / किंवा संस्थांच्या पदाधिकाऱ्यांसोबत कोणताही विचार विनिमय / चर्चा न करता, आपण हा अतिरिक्त कर रुपी आर्थिक बोजा लादण्याचे जवळ जवळ ठरवूनच टाकल्यासाखे प्रथम दर्शनी भास होतो. सादर बाबीबाबत, आम्ही आपणास काही गोष्टी जाणीवपूर्वक निदर्शनास आणून देऊ इच्छितो

सदर उपनगरात ९८ सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. या सर्व संस्था अल्प उत्पन्न (LIG) प्रवर्गातील असून त्या सण १९९० - ९२ च्या काळात महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (MHADA) यांनी वसवलेल्या आहेत. थोडक्यात असे की, या संस्थांमधून राहत असल्याने सदर सदनिका धारकांचे अदमासे मासिक उत्पन्न सहाशे रुपये ६०० ते रुपये १५०० इतके होते. अशा कमी (अल्प) उत्पन्नाच्या सदनिकाधारकांसाठी शासनाने ना नफा ना तोटा या तत्त्वावर आमची ही निवासी वसाहत म्हाडामार्फत वसवली. सदर नगरातील सर्व सदनिका या ४० मीटर, ३० मीटर, २५ मीटर क्षेत्राच्या आहेत. थोडक्यात सर्व सदनिका या ५०० फूट चटई क्षेत्रापेक्षा कमी आहेत. सदर

...पुढे पहा



Scanned with CamScanner

# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवाशी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. : महाराष्ट्र राज्य/मुंबई/१९६६/२०१२/जी.बी.बी.एस.डी.




वसाहतीत असणाऱ्या सदनिका या पत्र्याचे छप्पर असणाऱ्या आहेत. सदर सदनिकाधारक राहत असणाऱ्या सदनिकेस लिफ्ट किंवा असे कोणतेही उच्च उत्पन्न गटात असणाऱ्या सुविधांचा वापर करता येत नाही. अल्प उत्पन्न गट असल्याकारणाने, त्यावेळी लावण्यात आलेला मालमत्ता कर देयक आजतागायत महानगर पालिकेने देखील कोणताही तिळमात्र बदल न करता महानगर पालिकेमार्फत घेण्यात येत आहे. एकीकडे शासन महानगरपालिके मार्फत मुंबईतील सर्व ५०० चौरस फूट चटई क्षेत्र असणाऱ्या सदनिकांचा पालिकेचा कर पूर्णतः माफ करण्याची भूमिका मांडत आहे, धोरण अवलंबन करण्याचा मानस जाहीर करत आहे आणि आपल्या मार्फत या मालमत्ता करात अचानक एवढी वाढ करण्यासंभंधित संस्थेसोबत पत्रव्यवहार चालू केला आहे, हे सर्व अनाकलनिय आहे.

ज्या पद्धतीने म्हाडाने ही वसाहत ना नफा ना तोटा या तत्त्वावर वसवली व आम्हाला शक्यतो परी सूट देता येईल याची काळजी घेतली, नगरपालिकेला देखील पाणीपट्टी, मलनिस्सारण, मालमत्ता कर यात सूट देण्याचे आदेश दिले त्याच तत्वावर येथील संस्था सदनिकाधारक सदनिकाधारकांवर कोणताही अतिरिक्त बोजा होणार नाही याची काळजी घेऊनच या सर्व संस्था चालत आहेत याची देखील आपण नोंद घ्यावी

आज देखील नगरातील सदनिका या सिमेंटच्या छप्पर असणाऱ्या आहेत. या संस्थांमध्ये कोणत्याही उच्च गटातील सुविधा देण्यात आलेल्या नाहीत आणि भविष्यातही अशा सुविधा अंमलात आणू शकत नाहीत, उदाहरणार्थ उद्वाहक (Lift) कारण सदनिका लहान आहेत, बैठी घरे आहेत त्यामुळे अशा सुविधा आम्ही उपभोगूच शकत नाही

**वरील मुद्दे खाली थोडक्यात मांडत आहे**

१. सदर संस्था या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (MHADA) यांच्या सहयोगाने अल्प उत्पन्न प्रवर्गातील (Low Income Group - LIG) आहेत.
२. सदर संस्थांमध्ये असणाऱ्या सदनिका घरावर पत्र्याचे छप्पर असणाऱ्या आहेत.
३. या संस्था लिफ्ट सारखे उच्च उत्पन्न गटातील कोणताही लाभ घेत नाहीत आणि त्यांना तसा लाभ घेताही येणार नाही

...पुढे पहा



Scanned with CamScanner

४. संस्थेंमधील सदनिका या मुख्यतः निवासी गाळे आहेत.

५. सदर नगरात २००९ - २०१० मध्ये नगरपालिकेकडून उच्च न्यायालय आणि सर्वोच्च्य न्यायालयाच्या निर्देशांवरून तोडक कारवाई करण्यात आली आणि त्यानंतर इतका मोठा कोणताही बदल सादर संस्थांमधून झालेला नाही.

६. लवकरच सर्व संस्था पुनर्विकासास जाणार आहेत आणि त्याची तशी वाटचाल देखील चालू आहे.

सदर मालमत्ता देयकाबाबत आपण पुनर्विचार करावा व त्याकरता आम्हा सदनिकाधारक आपल्या सोबत चर्चा करण्यास वेळ द्यावा. तोपर्यंत आपण पाठवलेल्या नव्या मालमत्ता देयकाबाबत आपला निर्णय स्थगित ठेवावा ही नम्र विनंती आपण आमच्या विनंतीस मन देऊन सदर कराबाबत आपण पुनर्विचार कराल अशी आशा बाळगतो.

आपले नम्र

कळावे

आपले विश्वासू

स. व. प. न. रहिवासी वेल्फेअर असोसिएशन

| आनंद जाधव | सुर्यकांत ननावरे | अनिल परदेशी |
|---|---|---|
| ९९६७०९४०९४ | ९८२१७२७९९४ | ९८३३०९२४१८ |
| (अध्यक्ष) | (सचिव) | (खजिनदार) |

प्रत रवाना :
आमदार वर्सोवा विधानसभा मा. डॉ. भारतीताई लव्हेकर मॅडम
स्थानिक नगरसेवक मा. रोहन राठोड साहेब



Scanned with CamScanner

O/C

# सरदार वल्लभभाई पटेल नगर रहिवाशी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. : महाराष्ट्र राज्य/मुंबई/१९६६/२०१२/जी.बी.बी.एस.डी.

दिनांक २६ डिसेंबर २०१९

सहायक आयुक्त
के/पश्चिम विभाग
(28) 30 DEC 2019
१२,१३,१४,१५,१६,१७
के/प.

प्रति

**बृहन्मुंबई महानगर पालिका,**
**सहाय्यक मूल्यांकनकर्ता आणि जिल्हाधिकारी के / पश्चिम,**
नगरपालिका प्रभाग कार्यालय, तिसरा मजला,
अंधेरी (डब्ल्यू), मुंबई ४०० ०५३

**विषय: करसंकलन विभागाकडून नव्याने पाठवण्यात येत असलेल्या नवीन मालमत्ता कर देयका संदर्भात पुनश्च विचार करण्याकरिता निवेदन**

महोदय,

आम्ही सरदार वल्लभभाई पटेल नगर रहिवासी वेल्फेअर असोसिएशन मार्फत अशी नम्र विनंती करू इच्छितो कि, आपण सरदार वल्लभभाई पटेल नगरातील बैठ्या सहकारी संस्थांना नव्याने अंमलात येणाऱ्या धोरणानुसार बदल करून मालमत्ता कारासंबंधित पत्रव्यवहार सुरु केला आहे. आपण किंवा नगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्याने संस्थांना आणि / किंवा संस्थांच्या पदाधिकाऱ्यांसोबत कोणताही विचार विनिमय / चर्चा न करता, आपण हा अतिरिक्त कर रुपी आर्थिक बोजा लादण्याचे जवळ जवळ ठरवूनच टाकल्यासाखे प्रथम दर्शनी भास होतो. सादर बाबीबाबत, आम्ही आपणास काही गोष्टी जाणीवपूर्वक निदर्शनास आणून देऊ इच्छितो

सदर उपनगरात ९८ सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. या सर्व संस्था अल्प उत्पन्न (LIG) प्रवर्गातील असून त्या सण १९९० - ९२ च्या काळात महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (MHADA) यांनी वसवलेल्या आहेत. थोडक्यात असे की, या संस्थांमधून राहत असल्याने सदर सदनिका धारकांचे अदमासे मासिक [illegible] साहाशे रुपये ६०० ते रुपये १५०० इतके होते. अशा कमी (अल्प) उत्पन्नाच्या सदनिकाधारकांसाठी शासनाने [illegible] नफा ना तोटा या तत्त्वावर आमची ही निवासी वसाहत म्हाडामार्फत वसवली. सदर नगरातील सर्व सदनिका [illegible] मीटर, ३० मीटर, २५ मीटर क्षेत्राच्या आहेत. थोडक्यात सर्व सदनिका या ५०० फूट चटई क्षेत्रापेक्षा कमी आहेत. सदर

...पुढे पहा

प्लॉट नं ७८ / बी - १४, व.अं.साथी स.गृ.सं.म., सरदार वल्लभभाई पटेल नगर, (म्हाडा), वर्सोवा, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३
www.svpnrwa.in

Scanned with CamScanner

वसाहतीत असणाऱ्या सदनिका या पत्र्याचे छप्पर असणाऱ्या आहेत. सदर सदनिकाधारक राहत असणाऱ्या सदनिकेस लिफ्ट किंवा असे कोणतेही उच्च उत्पन्न गटात असणाऱ्या सुविधांचा वापर करता येत नाही. अल्प उत्पन्न गट असल्याकारणाने, त्यावेळी लावण्यात आलेला मालमत्ता कर देयक आजतागायत महानगर पालिकेने देखील कोणताही तिळमात्र बदल न करता महानगर पालिकेमार्फत घेण्यात येत आहे. एकीकडे शासन महानगरपालिके मार्फत मुंबईतील सर्व ५०० चौरस फूट चटई क्षेत्र असणाऱ्या सदनिकांचा पालिकेचा कर पूर्णतः माफ करण्याची भूमिका मांडत आहे, धोरण अवलंबन करण्याचा मानस जाहीर करत आहे आणि आपल्या मार्फत या मालमत्ता करात अचानक एवढी वाढ करण्यासंभंधित संस्थेसोबत पत्रव्यवहार चालू केला आहे, हे सर्व अनाकलनिय आहे.

ज्या पद्धतीने म्हाडाने ही वसाहत ना नफा ना तोटा या तत्त्वावर वसवली व आम्हाला शक्यतो परी सूट देता येईल याची काळजी घेतली, नगरपालिकेला देखील पाणीपट्टी, मलनिस्सारण, मालमत्ता कर यात सूट देण्याचे आदेश दिले त्याच तत्वावर येथील संस्था सदनिकाधारक सदनिकाधारकांवर कोणताही अतिरिक्त बोजा होणार नाही याची काळजी घेऊनच या सर्व संस्था चालत आहेत याची देखील आपण नोंद घ्यावी

आज देखील नगरातील सदनिका या सिमेंटच्या छप्पर असणाऱ्या आहेत. या संस्थांमध्ये कोणत्याही उच्च गटातील सुविधा देण्यात आलेल्या नाहीत आणि भविष्यातही अशा सुविधा अंमलात आणू शकत नाहीत, उदाहरणार्थ उद्वाहक (Lift) कारण सदनिका लहान आहेत, बैठी घरे आहेत त्यामुळे अशा सुविधा आम्ही उपभोगूच शकत नाही

**वरील मुद्दे खाली थोडक्यात मांडत आहे**

१. सदर संस्था या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (MHADA) यांच्या सहयोगाने अल्प उत्पन्न प्रवर्गातील (Low Income Group - LIG) आहेत.
२. सदर संस्थांमध्ये असणाऱ्या सदनिका घरावर पत्र्याचे छप्पर असणाऱ्या आहेत.
३. या संस्था लिफ्ट सारखे उच्च उत्पन्न गटातील कोणताही लाभ घेत नाहीत आणि त्यांना तसा लाभ घेताही येणार नाही

...पुढे पहा



Scanned with CamScanner

# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवाशी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र.: महाराष्ट्र राज्य/मुंबई/१९६६/२०१२/जी.बी.बी.एस.डी.




४. संस्थेंमधील सदनिका या मुख्यतः निवासी गाळे आहेत.

५. सदर नगरात २००९ - २०१० मध्ये नगरपालिकेकडून उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांवरून तोडक कारवाई करण्यात आली आणि त्यानंतर इतका मोठा कोणताही बदल सादर संस्थांमधून झालेला नाही.

६. लवकरच सर्व संस्था पुनर्विकासास जाणार आहेत आणि त्याची तशी वाटचाल देखील चालू आहे.

सदर मालमत्ता देयकाबाबत आपण पुनर्विचार करावा व त्याकरता आम्हा सदनिकाधारक आपल्या सोबत चर्चा करण्यास वेळ द्यावा. तोपर्यंत आपण पाठवलेल्या नव्या मालमत्ता देयकाबाबत आपला निर्णय स्थगित ठेवावा ही नम्र विनंती आपण आमच्या विनंतीस मन देऊन सदर कराबाबत आपण पुनर्विचार कराल अशी आशा बाळगतो.

आपले नम्र

कळावे

आपले विश्वासू

स. व. प. न. रहिवासी वेल्फेअर असोसिएशन

| आनंद जाधव | सुर्यकांत ननावरे | अनिल परदेशी |
|---|---|---|
| ९९६७०९४०९४ | ९८२१७२७९९४ | ९८३३०९२४१८ |
| (अध्यक्ष) | (सचिव) | (खजिनदार) |

प्रत रवाना :
शिवसेना खासदार मा. श्री गजानन कीर्तिकर साहेब



Scanned with CamScanner

0/c


# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवाशी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. : महाराष्ट्र राज्य/मुंबई/१९६६/२०१२/जी.बी.बी.एस.डी.


दिनांक २६ डिसेंबर २०१९

प्रति

**शिवसेना खासदार मा. श्री गजानन कीर्तिकर साहेब**
वर्सोवा, अंधेरी (प.)
मुंबई ४०० ०५३

**विषय: करसंकलन विभागाकडून नव्याने पाठवण्यात येत असलेल्या नवीन मालमत्ता कर देयका संदर्भात पुनश्च विचार करण्याकरिता निवेदन**

महोदय,

आम्ही सरदार वल्लभभाई पटेल नगर रहिवासी वेल्फेअर असोसिएशन मार्फत अशी नम्र विनंती करू इच्छितो कि, आपण सरदार वल्लभभाई पटेल नगरातील बैठ्या सहकारी संस्थांना नव्याने अंमलात येणाऱ्या धोरणानुसार बदल करून मालमत्ता कारासंबंधित मुंबई महानगर पालिकेतर्फे सदर बैठ्या सहकारी संस्थांसोबत पत्रव्यवहार सुरु केला आहे. या संबंधित मुंबई महानगर पालिकेतर्फे कोणत्याही अधिकाऱ्याने संस्थांना आणि / किंवा संस्थांच्या पदाधिकाऱ्यांसोबत कोणताही विचार विनिमय / चर्चा न करता, सदर अतिरिक्त कर रुपी आर्थिक बोजा लादण्याचे जवळ जवळ ठरवूनच टाकल्यासाखे प्रथम दर्शनी भास होतो. सदर बाबीबाबत, आम्ही मुंबई महानगर पालिकेस लेखी विनंती वजा विनवणी केली आहे. सदर पत्राची प्रत सोबत जोडत आहोत. सादर पात्रातील महत्वाचे मुद्दे आपल्या माहितीसाठी खाली देत आहोत.

१. नगरात एकूण ९८ संस्था असून, त्यातील ८ संस्था पुनर्विकासास गेल्या आहेत आणि राहिलेल्या ९० संस्था पुनर्विकासाच्या प्रक्रियेसाठी तयार आहेत.
२. सदर संस्था या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (MHADA) यांच्या सहयोगाने अल्प उत्पन्न प्रवर्गातील (Low Income Group - LIG) जनतेसाठी शासनाने ना नफा ना तोटा सन १९९० - १९९२ या कालावधीत तत्त्वावर वसवली.
३. नगरातील या सर्व संस्थांमधील सदनिकेस घरावर पत्र्याचे छप्पर असणाऱ्या आहेत.
४. प्रामुख्याने सदर संस्थांमधील सदनिका या निवासी गाळे आहेत.
५. सदर नगरातील सर्व सदनिका या ४० मीटर, ३० मीटर किंवा २५ मीटर क्षेत्राच्या आहेत. थोडक्यात सर्व सदनिका या ५०० फूट चटई क्षेत्रापेक्षा कमी आहेत.

**...पुढे पहा**



Scanned with CamScanner

# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवाशी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. : महाराष्ट्र राज्य/मुंबई/१९६६/२०१२/जी.बी.बी.एस.डी.




६. सदर सदनिकाधारक राहत असणाऱ्या सदनिकेस लिफ्ट किंवा असे कोणतेही उच्च उत्पन्न गटात असणाऱ्या सुविधांचा वापर करता येत नाही.

७. अल्प उत्पन्न गट असल्याकारणाने, महानगर पालिकेने मालमत्ता कर देयक त्यानुसार आजपर्यंत वसूल करत आहे.

८. सदर नगरात २००९ - २०१० मध्ये नगरपालिकेकडून उच्च न्यायालय आणि सर्वोच्च्व न्यायालयाच्या निर्देशांवरून तोडक कारवाई करण्यात आली आणि त्यानंतर इतका मोठा कोणताही बदल सादर संस्थांमधून झालेला नाही.

९. लवकरच सर्व संस्था पुनर्विकासास जाणार आहेत आणि त्याची तशी वाटचाल देखील चालू आहे.

१०. एकीकडे शासन महानगरपालिके मार्फत मुंबईतील सर्व ५०० चौरस फूट चटई क्षेत्र असणाऱ्या सदनिकांचा पालिकेचा कर पूर्णतः माफ करण्याची भूमिका मांडत आहे, धोरण अवलंबन करण्याचा मानस जाहीर करत आहे आणि महानगर पालिका या मालमत्ता करात अचानक जवळ जवळ अडीच पट वाढ कारण्यासंबंधित संस्थेसोबत पत्रव्यवहार चालू केला आहे.

सदर मालमत्ता देयकाबाबत पुनर्विचार होऊन सदर कराचा कोणताही अतिरिक्त बोजा न लावता शक्य तेवढी सूट मिळावी, यासाठी आपण नगरातील जनतेस न्याय मिळावा आणि त्यासाठी आपण वैयक्तिकरित्या लक्ष घालून योग्य ती मदत करावी हि नम्र विनंती. आपण आमच्या विनंतीस मान देऊन सदर कराबाबत महानगर पालिका आम्हास योग्य तो कर लावतील यासाठी आपण प्रयत्न कराल अशी आशा बाळगतो.

आपले विश्वासू

स. व. प. न. रहिवासी वेल्फेअर असोसिएशन

| | | |
|---|---|---|
| आनंद जाधव | सुर्यकांत ननावरे | अनिल परदेशी |
| ९९६७०९४०९४ | ९८२१७२७९९४ | ९८३३०९२४१८ |
| (अध्यक्ष) | (सचिव) | (खजिनदार) |

**सोबत : बृहन्मुंबई महानगर पालिका, सहाय्यक मूल्यांकनकर्ता आणि जिल्हाधिकारी के / पश्चिम, यांस दिलेले पत्र**


प्लॉट नं ७८ / बी - १४, व.अं.साथी स.गृ.सं.म., सरदार वल्लभभाई पटेल नगर, (म्हाडा), वर्सोवा, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३
www.svpnrwa.in


Scanned with CamScanner

# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवाशी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. : महाराष्ट्र राज्य/मुंबई/१९६६/२०१२/जी.बी.बी.एस.डी.

सहायक आयुक्त
के/पश्चिम विभाग
२१
21 JAN 2020
वेळ - ११,१२,१३,१४,१५,१६,१७
के/प.

दिनांक २१ जानेवारी २०२०

प्रति,
मा. कर निर्धारक आणि संकलक
अंधेरी के (पश्चिम) प्रभाग,
महानगरपालिका प्रभाग कार्यालय, तिसरा मजला,
अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३

**विषय : भांडवली मूल्यावर आधारित कर प्रणाली नुसार सरदार वल्लभभाई पटेल नगर म्हाडा वसाहतीमधील गृहनिर्माण संस्थांना देण्यात आलेल्या देयकात सवलत मिळण्यावावत निवेदन.**

महोदय,

भांडवली मूल्यावर आधारित कर प्रणाली नुसार आपल्या कार्यालयातर्फे नगरातील संस्थांना देयके जारी झाली आहेत. त्यानुसार ज्या सदनिकाधारकांनी पहिला मजला बनविला आहे त्यांना व व्यावसायिक प्रयोजन असलेल्या सदनिकाधारकांना वैयक्तिक वाढीव मालमत्ता कर लागू करण्यात आला आहे.

सदर वसाहत हि म्हाडा प्राधिकरणाने जागतिक बँक प्रकल्पाअंतर्गत बनविली असून अल्प उत्पन्न धारक (Lower Income Group) गटाच्या सदनिका स्वरूपात घरे आहेत.

**नगरातील संस्थांना वृहन्मुंबई महानगर पालिका अधिनियम १८८८ कलम १४४ बी अंतर्गत १९९५ पासून पुढील २० वर्षांकरिता मालमत्ता करात सवलत देण्यात आलेली होती.** परिणामी कमी मालमत्ता करामुळे कमी व्यवस्थापन वर्गणी सदनिकाधारकांना द्यावी लागत होती. परंतु भांडवली मूल्यावर आधारित कर प्रणाली नुसार एकाच संस्थेत वेगवेगळ्या मालमत्ता करामुळे वैयक्तिक व्यवस्थापन वर्गणी वेगवेगळ्याप्रकारे आकारावी लागणार आहे.

***आपण पाठविलेले "परिशिष्ट अ (Annexure A)" अभ्यासल्यास असे निदर्शनास आले आहे कि आपण कर आकारणी २०१३ पासून केलेली आहे. तसेच शासकीय अधिसूचनेनुसार ५०० फुटापर्यंतची घरे मालमत्ता करातून वगळण्यात आली असल्याचे प्रसिद्ध करण्यात आले आहे. परिणामी आपण पूर्वलक्षी प्रभावाने २०१३ पासून कर आकारणी देयक तयार केलेले दिसत आहे.***

**त्या ऐवजी ज्यादिवशी शासकीय अधिसूचना १० मार्च २०१९ रोजी लागू झाली, त्या तारखेपासून आपण भांडवली मूल्यावर आधारित कर लागू करावा अशी मागणी आम्ही करत आहोत. मुळातच भांडवली**

**...पुढे पहा**

प्लॉट नं ७८ / बी - १४, व.अं.साथी स.गृ.सं.म., सरदार वल्लभभाई पटेल नगर, (म्हाडा), वर्सोवा, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३
www.svpnrwa.in

Scanned with CamScanner

सरदार वल्लभभाई पटेल नगर
रहिवाशी वेल्फेअर असोसिएशन
नोंदणी क्र. : महाराष्ट्र राज्य/मुंबई/१९६६/२०१२/जी.बी.बी.एस.डी.



मूल्य निश्चित करणे नियम २०१५ पासून लागू झालेला असताना कर आकारणी २०१३ पासून करणे संयुक्तिक वाटत नाही.

त्या ऐवजी ज्यादिवशी शासकीय अधिसूचना १० मार्च २०१९ रोजी लागू झाली, त्या तारखेपासून आपण भांडवली मूल्यावर आधारित कर लागू करावा अशी मागणी आम्ही करत आहोत. मुळातच भांडवली मूल्य निश्चित करणे नियम २०१५ पासून लागू झालेला असताना कर आकारणी २०१३ पासून करणे संयुक्तिक वाटत नाही.

*तसेच व्यावसायिक प्रयोजनाकरिता ४० मीटर आकारमानाच्या सदनिकाधारकास आपण त्याचे मूळ चटईक्षेत्र सह एटीक मजल्यासह उर्वरित क्षेत्राचे चटई क्षेत्र असे एकत्रित करून कर आकारणी केली आहे. त्यात नियमास अधीन राहून सूट मिळाल्यास त्या सदनिकाधारकांना वैयक्तिक मालमत्ता कर देणे सोयीचे होईल.*

*त्याचप्रमाणे २५ व ३० मीटरच्या ज्या सदनिकाधारकांचे अतिरिक्त मजला संपूर्णतया मोजला आहे तो निव्वळ पोटमाळा अर्थात एटिक लॉफ्ट एवढ्याच आकारमानाचा गृहीत धरून त्याच्या मजल्याची कर आकारणी करण्यात यावी जेणेकरून त्या सदनिकाधारकांना वैयक्तिक मासिक व्यवस्थापन वर्गणी भरणे सोयीचे होईल.*

त्याचप्रमाणे नगरातील सर्व संस्थानी विनिमय ३३(५) अंगतर्गत उपलब्ध ३ चटई क्षेत्राचा लाभ घेऊन पुनर्विकासास जाण्याची सुरवात केली आहे. परिणामी महानगरपालिका अधिनियम १८८८ कलम १४४ इ. नुसार काही सवलत मालमत्ता करात उपलब्ध होत असल्यास तसेही मार्गदर्शन करावे हि विनंती.

नगरातील सदनिकाधारकांच्या रास्त व नियमास अनुसरून असणाऱ्या उपरोक्त मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून आपण सहकार्य करावे हि विनंती.

आपले विश्वासू

स. व. प. न. रहिवासी वेल्फेअर असोसिएशन

| आनंद जाधव | सुर्यकांत ननावरे | अनिल परदेशी |
|---|---|---|
| ९९६७०९४०९४ | ९८२१७२७९९४ | ९८३३०९२४१८ |
| (अध्यक्ष) | (सचिव) | (खजिनदार) |

**प्रत रवाना :**

१. **मा. रोहनजी राठोड**, नगरसेवक (भाजपा)

२. **मा. शैलेशजी फणसे**, मा. स्थायी समिती अध्यक्ष (शिवसेना)



Scanned with CamScanner

सरदार वल्लभभाई पटेल नगर
रहिवाशी वेल्फेअर असोसिएशन
नोंदणी क्र. : महाराष्ट्र राज्य/मुंबई/१९६६/२०१२/जी.बी.बी.एस.डी.

दिनांक २८ जानेवारी २०२०

प्रति,

मा. कर संकलक व कर निर्धारक
के पश्चिम विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका,
महानगरपालिका प्रभाग कार्यालय, तिसरा मजला,
अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३

सहायक आयुक्त
के/पश्चिम विभाग
11 FEB 2020
वेळ -११,१२,१३,१४,१५,१६,१७
के/प.

**विषय : भांडवली मूल्य कर आकारणी नियम २०१५ अंतर्गत जारी करण्यात आलेल्या देयकातील पूर्वलक्ष्य प्रभावाने लागू करण्यात आलेल्या अतिरिक्त कराची आकारणी २०१३ ऐवजी २०१९ पासून करण्याबावत निवेदन.**

महोदय,

***आमच्या घरांचे चटई क्षेत्र बहुविध भारांक वापरून आम्हास कमीत कमी कर भरावा लागेल याची आपण दखल घेतल्याबद्दल सर्व प्रथम आपले आभार.***

आपल्या कार्यालयातर्फे, भांडवली मुल्यावर आधारित कर प्रणाली नुसार पूर्वलक्षी प्रभावाने २०१३ पासून अतिरिक्त रकमेची मागणी करणारे देयक **"परिशिष्ट अ"** सहित नगरातील बहुतेक संस्थांना संस्थेस प्राप्त झाले आहे.

**नगरातील बहुतेक संस्थांनी आजतागायत नियमितपणे मालमत्ता कर महानगरपालिकेस नियमित जमा केला आहे. नवीन भांडवली मूल्यावर आधारित कर प्रणाली नुसार पूर्वलक्षी प्रभावाने आमच्याकडून अतिरिक्त कराची आकारणी आपण उपरोक्त देयकात केलेली आहे.**

**भांडवली मूल्य आधारित कर आकारणी कायदा २०१५ मध्ये लागू झाला. सदर कर आकारणी करण्याबाबतची शासकीय अधिसूचना १० मार्च २०१९ रोजी लागू झाली, परिणामी भांडवली मूल्य आधारित कर आकारणी पूर्वलक्षी प्रभावाने न करता एप्रिल २०१९ पासून करावी हि विनंती**

कायद्याची अंमलबजावणी करण्याचा भाग म्हणून आपल्या कार्यालयाकडून २०१६ मध्ये संस्थेतील सदनिकांचे आकारमान, बांधकामाची माहिती इत्यादी मागविण्यात आली होती परंतु सदर प्रक्रियेबाबतची अनभिज्ञता व त्या दरम्यान झालेला तोडकं कारवाईमुळे बहुतांश संस्थांनी आपणास माहिती कळविली नाही हे आपण आमच्या



Scanned with CamScanner

# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवाशी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. : महाराष्ट्र राज्य/मुंबई/१९६६/२०१२/जी.बी.बी.एस.डी.


निदर्शनास आणून दिले. परंतु, याची उपयुक्तता आणि उपयुक्तता आणी महत्व संस्थेच्या पदधिकर्यना त्याचा ऊपयोग कर प्रणाली सुधारीत करण्यासाठी होणार असल्याची माहिती नसल्याने लक्षात आली नाही....

कायदे हे त्याचे पालन करणाऱ्यां प्रामाणिक नागरिकांना अभय देतात त्याच न्यायाने आम्ही करदात्या गृहनिर्माण संस्था आपणाकडे कर आकारणी कालावधी मध्ये सूट मागत आहोत,

तरी आमच्या विनंतीचा गांभीर्याने विचार करून आम्हास उपरोक्त सवलत द्यावी हि विनंती

कळावे

आपले विश्वासू

**स. व. प. न. रहिवासी वेल्फेअर असोसिएशन**

| आनंद जाधव | सुर्यकांत ननावरे | अनिल परदेशी |
|---|---|---|
| ९९६७०९४०९४ | ९८२१७२७९९४ | ९८३३०९२४१८ |
| (अध्यक्ष) | (सचिव) | (खजिनदार) |

**प्रत रवाना :**

मा उप आयुक्त<br>
कर संकलन व निर्धारण विभाग<br>
बृहन्मुंबई महानगर पालिका



Scanned with CamScanner

# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवाशी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. : महाराष्ट्र राज्य/मुंबई/१९६६/२०१२/जी.बी.बी.एस.डी.

सहायक आयुक्त
के/पश्चिम विभाग
12 FEB 2020
वेळ -११,१२,१३,१४,१५,१६,१७
के/प.

दिनांक: ११ फेब्रुवारी २०२०

प्रति,

मा. कर संकलक व कर निर्धारक
के पश्चिम विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका,
महानगरपालिका प्रभाग कार्यालय, तिसरा मजला,
अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३

**विषय : भांडवली मूल्यावर आधारित कर देयके वितरित करण्यात आलेल्या सरदार वल्लभ भाई पटेल नगर वसाहतीमधील ३७ संस्थांव्यतिरिक्त अन्य संस्थांना तशाप्रकारची देयके न देण्याबाबत निवेदन .**

महोदय,

भांडवली मूल्यावर आधारित कर प्रणालीनुसार आपल्या कार्यक्षेत्रातील सरदार वल्लभ भाई पटेल नगरातील ३७ संस्थांना वितरित करण्यात आलेली आहेत. त्यामुळे नवीन व्यवस्थापन वर्गणी लागू करून वाढीव कराची पूर्तता महानगर पालिकेस करणे बाबत संस्थांचे पदाधिकारी व सदनिकाधारक यांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**अशा परिस्तिथीमध्ये प्रस्तुत असोसिएशन आपणाकडे अशी मागणी करत आहे कि ज्या ३७ संस्थांना नवीन देयके जारी करण्यात आली आहेत त्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही संस्थांना नवीन देयके आपण जारी करू नयेत.**

**ज्या संस्थांना देयके जारी करण्यात आली आहेत त्या संस्थांनाही पूर्वलक्षी प्रभावाने करण्यात आलेली कर वाढ रद्द करावी या करीता आम्ही थेट माननीय आयुक्त ते कर निर्धारक विभागाशी संबंधित सर्व अधिकारी वर्गास प्रत्यक्षात भेटून लेखी निवेदन देऊन मागणी करत आलेलो आहोत.**

***तरी विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन नगरातील ३७ संस्थांव्यतिरिक्त उर्वरित संस्थांना भांडवली मूल्यावर आधारित देयके पाठवू नयेत हि विनंती.***

कळावे

आपले विश्वासू

**स. व. प. न. रहिवासी वेल्फेअर असोसिएशन**

| आनंद जाधव | सुर्यकांत ननावरे | अनिल परदेशी |
|---|---|---|
| ९९६७०९४०९४ | ९८२१७२७९९४ | ९८३३०९२४१८ |
| (अध्यक्ष) | (सचिव) | (खजिनदार) |



Scanned with CamScanner

# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवाशी वेल्फेअर असोसिएशन

॥ एकमेका सहाय्य करु । अवघे धरु सुपंथ ॥

नोंदणी क्र. : महाराष्ट्र राज्य/मुंबई/१९६६/२०१२/जी.बी.बी.एस.डी.


दिनांक: १४ फेब्रुवारी २०२०

प्रति,

**मा. कर संकलक व कर निर्धारक**
के पश्चिम विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका,
महानगरपालिका प्रभाग कार्यालय, तिसरा मजला,
अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३

**विषय : भांडवली मूल्यावर आधारित कर देयकाबाबत मार्गदर्शन करणाऱ्या सभेत मार्गदर्शन करण्याबाबाबत विनंती / निवेदन.**

महोदय,

सरदार वल्लभभाई पटेल नगर म्हाडा वसाहतीमध्ये भांडवली मूल्यावर आधारित कर देयके ३७ संस्थांना वितरित करण्यात आलेली आहेत. **सदर देयकाबाबत आक्षेप, प्रस्ताव असोसिएशनने लेखी स्वरूपात आणि प्रत्यक्षात आपणास भेटून सादर केले आहेतच. तसेच मा. आयुक्त आणि उपायुक्त मालमत्ता विभाग यांनाही निवेदन सादर केले आहे. नगरातील सदनिकाधारकांचेही त्या संदर्भात प्रबोधन असोसिएशन करतच आहे.**

***आमच्या व्यतिरिक्त, नगरातील इतरही काही व्यक्ती आपणास प्रत्यक्ष भेटून गेली आहेत, भेटत आहेत. वेगवेगळ्या व्यक्ती आपणास वेगवेगळ्या वेळी भेटल्यामुळे, भेटत असल्यामुळे या विषयासंबधीत इतर सदनिकाधारकांस योग्य तो सल्ला मिळत नसून नगरातील अनेक सदनिकाधारक अजूनही संभ्रमात आहेत.***

**परिणामी करदात्या सामान्य सदनिकाधारकांना कर पद्धती आणि त्यात आपण दिलेल्या सवलतीची माहिती देण्याकरिता असोसिएशन एक जाहीर सभा घेण्याचे योजत आहे.** सदर सभेस आपण उपस्थित राहून मार्गदर्शन केले तर नगरातील सर्व सदनिकाधारकांस आपले मार्गदर्शन लाभून संभ्रम दूर होण्यास मदत होईल.

तरी सभेस आपण कधी उपस्तिथ राहू शकाल ते कळवावे हि विनंती जेणेकरून सभेची तारीख व कार्यक्रम आखून तो सदनिकाधारकांना कळविणे सोयीचे होईल.

आपले विश्वासू,

**स. व. प. न. रहिवासी वेल्फेअर असोसिएशन**

| सहायक आयुक्त<br>के/पश्चिम विभाग<br>20 FEB 2020<br>वेळ-११,१२,१३,१४,१५,१६,१७ | आनंद जाधव<br>९९६७०९४०९४<br>(अध्यक्ष) | सुर्यकांत ननावरे<br>९८२१७२७९९४<br>(सचिव) | अनिल परदेशी<br>९८३३०९२४१८<br>(खजिनदार) |
|---|---|---|---|



Scanned with CamScanner

# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवाशी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. : महाराष्ट्र राज्य/मुंबई/१९६६/२०१२/जी.बी.बी.एस.डी.

दिनांक: १४ फेब्रुवारी २०२०

प्रति,

मा शैलेशजी फणसे,
विभाग संघटक, अंधेरी विधान सभा
मा. स्थायी समिती अध्यक्ष तथा
मा. शिवसेना नगरसेवक

**विषय : भांडवली मूल्यावर आधारित कर देयकाबाबत मार्गदर्शन करणाऱ्या सभेत मार्गदर्शन करण्याबाबाबत विनंती / निवेदन.**

महोदय

जय महाराष्ट्र !

**सरदार वल्लभ भाई पटेल नगर म्हाडा वसाहती मध्ये भांडवली मूल्यावर आधारित कर देयके ३७ संस्थांना प्राप्त झाली आहेत. सदर कर प्रणालीची माहिती घेऊन त्यासंदर्भात पत्रव्यवहार असोसिएशनने कर निर्धारक व संकलक विभागासोबत करून नगरातील सदनिकाधारकांचे प्रबोधन करण्यास सुरवात केली आहे .**

त्या अनुषंगाने कर निर्धारक व संकलक व आपल्या उपस्तीथी मध्ये सदनिकाधारकांना मार्गदर्शन करण्याकरिता सभा नगरात घेण्याचे आम्ही योजत आहोत. तशा आशयाचे पत्र उपरोक्त विभागास आम्ही पोच केले आहे .

**कर आकारणी विषयातील आपला अधिकार मोठा आहे. आपल्या व पालिका अधिकाऱ्यांच्या उपस्तीथी मध्ये नगरातील कर दात्या सदनिकाधारकांना मार्गदर्शन मिळाल्यास त्यांना योग्य माहिती प्राप्त होऊन त्यांच्यातील संभ्रमता संपूष्टात येईल.**

***तरी आपण मार्गदर्शन करून सभेस कधी उपस्तिथ राहता येईल तसे कळवावे हि विनंती.***

कळावे

आपले विश्वासू

**स. व. प. न. रहिवासी वेल्फेअर असोसिएशन**

| आनंद जाधव | सुर्यकांत ननावरे | अनिल परदेशी |
|---|---|---|
| ९९६७०९४०९४ | ९८२१७२७९९४ | ९८३३०९२४१८ |
| (अध्यक्ष) | (सचिव) | (खजिनदार) |

प्लॉट नं ७८ / बी - १४, व.अं.साथी स.गृ.सं.म., सरदार वल्लभभाई पटेल नगर, (म्हाडा), वर्सोवा, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३
www.svpnrwa.in

Scanned with CamScanner

# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवाशी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. : महाराष्ट्र राज्य/मुंबई/१९६६/२०१२/जी.बी.बी.एस.डी.


दिनांक: २४ फेब्रुवारी २०२०

प्रति,

मा. अध्यक्ष / सचिव
संस्था क्र ___ व. अ. ______________________ स.गृ संस्था मर्यादित
सरदार वल्लभभाई पटेल नगर,
वर्सोवा, अंधेरी (प.),
मुंबई ४०० ०५३

**विषय : भांडवली मूल्यावर आधारित पूर्वलक्षी प्रभावाने कर आकारणी करणाऱ्या देयकाबद्दल कर संकलक व निर्धारक के पश्चिम याना द्यावयाचा मसुदा.**

महोदय / महोदया

उपरोक्त विषयास अनुसरून असोसिएशन सातत्याने उप आयुक्त कर निर्धारक व संकलक यांच्या संपर्कात असून देयक प्राप्त गृहनिर्माण संस्था म्हणून आपलेही पत्र कर निर्धारक व संकलक के पश्चिम याना जाणे गरजेचे आहे त्याचा मसुदा येथे देत असून **आपण आपल्या संस्थेच्या लेटरहेडवर लिहून तो आपण वार्ड ऑफिस (K पश्चिम) मध्ये जमा करावा हि विनंती मसुदा पुढील प्रमाणे:**

प्रति

**मा. कर संकलक व कर निर्धारक**
के पश्चिम विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका,
महानगरपालिका प्रभाग कार्यालय, तिसरा मजला,
अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३

**विषय : संस्थेस प्राप्त झालेल्या भांडवली मूल्यावर आधारित कर देयकात पूर्वलक्षी प्रभावाने कर आकारणी न करता अधिसूचना जारी झाली तेव्हापासून करण्याकरिता निवेदन.**

**संदर्भ: संस्था क्र. ____ मालमत्ता क्र. ____________________**

महोदय,

आपल्या कार्यकक्षेतील सरदार वल्लभ भाई पटेल नगर, म्हाडा वसाहत, ४ बंगला येथे आमची गृहनिर्माण संस्था स्थित असून मालमत्ता क्र KW ________________ आहे.



Scanned with CamScanner

# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवाशी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. : महाराष्ट्र राज्य/मुंबई/१९६६/२०१२/जी.बी.बी.एस.डी.

आमच्या संस्थेस पूर्वलक्षी प्रभावाने अतिरिक्त कर आकारणी करणारे देयक प्राप्त झाले आहे. सदर अतिरिक्त कर आकारणी व्यावसायिक वापर आणि अतिरिक्त मजला, एटिक नावे करण्यात आलेली असून कर भरणा करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. सदर कर आकारणी पूर्वलक्षी प्रभावाने लागू केली असल्याने संबंधित सदनिकाधारकांच्या कर रकमेत अन्यायकारक वाढ झालेली आहे.

आजतागायत आम्ही आमचे सर्व देयक आम्ही वेळोवेळी महानगरपालिकेला भारत आलो असून, मार्च २०१९ पर्यंत आमची सर्व देयके भरण्यात आलेली आहेत. आजपर्यंत आमचे कोणतेही देयक बाकी नाही याची आपण नोंद घ्यावी.

परिणामी पूर्वलक्षी प्रभावाने कर आकारणी करण्याऐवजी ज्या दिवशी अर्थात १० मार्च २०१९ रोजी अधिसूचना जारी करण्यात आली तेव्हा पासून करावी अशी आम्ही मागणी करत आहोत. तसे झाल्यास संबंधित सदनिकाधारकास कर भरणे सोयीचे होईल.

कळावे

आपले विश्वासू

स. व. प. न. रहिवासी वेल्फेअर असोसिएशन

| आनंद जाधव | सुर्यकांत ननावरे | अनिल परदेशी |
|---|---|---|
| ९९६७०९४०९४ | ९८२१७२७९९४ | ९८३३०९२४१८ |
| (अध्यक्ष) | (सचिव) | (खजिनदार) |

प्लॉट नं ७८ / बी - १४, व.अं.साथी स.गृ.सं.म., सरदार वल्लभभाई पटेल नगर (म्हाडा), वर्सोवा, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३
www.svpnrwa.in

Scanned with CamScanner